दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.

जा.क्र.माअधि/अपिल/०२२/२०१७-१८
दि.०६/०४/२०१८.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.

श्री.केतन रसिकलाल महेता, ................अपिलार्थी
१०, साई स्नेहा इस्टेट, पंचाल रोड,
एच.पी.गेस गोडाऊन जवळ,
भाईंदर (पूर्व).

जनमाहिती अधिकारी तथा, ................प्रतिवाद
आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग

## -: विवेचन :-

श्री.केतन रसिकलाल महेता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांचेकडे दि.२१/११/२०१७ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

१. मिरा भायंदर मनपा के आस्थापना विभाग ने पिछले ०३ वर्ष मे मिरा भायंदर मनपा के ठेकेदार मेसर्स सैनिक सिक्युरिटी वाले मे ठेकेदार के कोन कोन से नाम वाले स्टाफ के लिए कोन कोन से महिने मे कितना रुपया पी.एफ के अंतर्गत कोन से ओफिस मे भरा था यह बाबत का सभी कागदपत्र का अवलोकन करते जरुरी कागद पत्र चाहिए।

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**

माहिती अधिकार अंतर्गत माहिती दिली नसल्याने अपिलार्थी यांनी दि.११/०२/२०१८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी व आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.०७/०३/२०१८ रोजी दुपारी १२.१० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.आस्था/२२२/२०१८ दि.१४/०२/२०१८ अन्वये कळविण्यात आले होते.

परंतु, सदर दिवशी मा.प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना) हे कार्यालयीन कामकाजासाठी बाहेर गेले असल्याकारणाने सुनावणी रद्द करण्यात आली असुन सदर सुनावणी मा.प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेसमोर दि.१७/०३/२०१८ रोजी आयोजित करण्यात आली आहे. तसेच सुनावणीस उपस्थित राहणेबाबत जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) व अपिलार्थी अर्जदार यांना जा.क्र.मिभामनपा/उपआ.आस्था/२४३/२०१८ दि.०८/०३/२०१८ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **<u>अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद</u>**:- माझ्या दि.२१/११/२०१७ रोजीच्या पत्रानुसार मला माहिती दिलेली नाही.

२) **<u>जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-</u>** तत्कालीन आस्थापना अधिक्षक यांनी दि.२७/११/२०१७ रोजी पत्र देऊन माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ पोटकलम (त्र) अन्वये माहिती नाकारण्यात आली आहे.

मे.सैनिक इंटेलिजन्स सिक्युरिटी प्रा.लि. यांना सुरक्षा रक्षकांच्या बाबतीत पी.एफ. तसेच इतर माहिती मिळणेबाबत प्रशासनाने पत्र देऊन कळविले असता मे.सैनिक इंटेलिजन्स सिक्युरिटी प्रा.लि. या एजन्सीने याबाबतची माहिती अन्य त्रयस्थ व्यक्तिंना देऊ नये असे कळविले आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**-: <u>निर्णय</u> :-**

१) जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांनी अपिलार्थी अर्जदाराने उपस्थित केलेल्या मुद्यांची अभिलेखात उपलब्ध असणारी माहिती १० दिवसांत अपिलार्थी अर्जदारास विनाशुल्क पुरविण्यात यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात आले.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना)
मिरा भाईंदर महानगरपालिका

O/C

Ketanlta
False information
Provided & False order
passed by API

प्रति:-

१) श्री.केतन रसिकलाल महेता,
१०, साई स्नेहा इस्टेट, पंचाल रोड,
एच.पी.गेस गोडाऊन जवळ, भाईंदर (पूर्व)

२) जन माहिती अधिकारी तथा
आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग

105
16/4/18

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना) यांचे कार्यालय.